**महाराष्ट्र शासनाच्या महा डीबीटी पोर्टल वर शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी आवश्यक पात्रता पुढीलप्रमाणे आहे**

1. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
2. अर्जदार हा संस्थेचा बोनाफाईड विद्यार्थी असावा.
3. विद्यार्थी एसएससी किंवा समतुल्य शालांत परीक्षा उत्तीर्ण असावा..
4. अर्जदाराने केंद्रीकृत ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेव्दारा (सीईटी) माध्यमातूनच प्रवेश घेतललेला असावा
5. व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश घेतलेल्यांना शिष्यवृत्तीची प्रतिपूर्ती केली जाणार नाही.
6. महाराष्ट्र शासनाच्या महा डीबीटी पोर्टल वर शिष्यवृत्तीचा लाभ मिळणेसाठी अर्जदाराने इतर कोणत्याही शिष्यवृत्ती/ स्टायपेन्डचा (विद्यावेतन) लाभ घेता कामा नये.
7. महा डीबीटी शिष्यवृत्ती ही केवळ दोनच अपत्यांसाठी लागू आहे. (मुलीना संख्येचे बंधन नाही)
8. उपस्थिती किमान ७५ टक्के बंधनकारक आहेत.अनुत्तीर्ण होणे, अपुरी उपस्थिती इ. मुळे शैक्षणिक प्रगती असमाधानकारक असल्यास प्रतिपूर्तीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.
9. अर्जदार हा एससी/एसटी / ओबीसी/ एसईबीसी/व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गातील असणे आणि त्याने जात प्रमाणपत्र व (एससी/एसटी) वगळून सर्वांनी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे गरजेचे आहे .
10. अर्जदार एससी/एसटी/ ओबीसी/ एसईबीसी/व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गातील असेल आणि तो फ्रीशिपधारक असेल तर त्यास जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र (Cast Validity) सादर करणे आवश्यक आहे.
11. अर्जदारांनी बिगर-व्यावसायिक अभ्यासक्रम बदलून व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतल्यास ते शिष्यवृत्तीसाठी पात्र असतील मात्र त्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रम बदलून बिगर-व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतल्यास ते पात्र असणार नाहीत.
12. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती (ईबीसी) योजनेसाठी दहावी नंतर प्रथम व बारावी नंतर व्दितीय वर्षासाठीच प्रवेश घ्यावा.
13. बारावी नंतर प्रथम वर्षास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांनी आकरावी व बारावीला शिष्यवृत्ती न घेतल्याचे प्रमाणपत्र सादर करावे
14. एससी/एसटी प्रवर्गातील विद्यार्थ्याना शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न २.५ लाख व ओबीसी/ एसईबीसी/ व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गातील उत्पन्न १.५ लाख तसेच जनरल प्रवर्गातील विद्यार्थ्याचे (राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजने साठी) संपूर्ण कुटुंबाचे एकूण उत्पन्न गृहीत धरण्यात येईल. एकूण कौटुंबिक उत्पन्न हे रु. 8 लाखांपर्यंत मर्यादित असावे
15. फ्रीशिप साठी एससी/एसटी प्रवर्गातील विद्यार्थ्याना शिष्यवृत्तीसाठी कोणतीही मर्यादा नाही.तसेच ओबीसी/ एसईबीसी/ व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गातील उत्पन्न १.५ लाख तसेच जनरल प्रवर्गातील विद्यार्थ्याचे (राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजने साठी) संपूर्ण कुटुंबाचे एकूण उत्पन्न गृहीत धरण्यात येईल. एकूण कौटुंबिक उत्पन्न हे रु. 8 लाखांपर्यंत मर्यादित असावे
16. अर्जदार शैक्षणिक वर्षात अनुत्तीर्ण झाल्यास त्यांना त्या वर्षासाठी शिकवणी, परीक्षा शुल्क आणि देखभाल भत्ता मिळेल; परंतु ते शैक्षणिक वर्षाची परीक्षा उत्तीर्ण होऊन पुढच्या वर्गात जाईपर्यंत त्यांना लाभ मिळणार नाही
17. शैक्षणिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेले जे अर्जदार चालू शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती /फ्रीशिपचा लाभ घेत आहेत, त्यांनी सुरू असलेला शैक्षणिक अभ्यासक्रम शैक्षणिक वर्षाच्या मध्यातच बदलला तर त्यांना याचा लाभ घेता येणार नाही.
18. अर्जदारास चालू शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्तीचा पूर्ण लाभ घेण्यासाठी वर्षाचे दोन्ही सत्र परीक्षा देणे बंधनकारक असेल, अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास सदर वर्षाची शिष्यवृत्ती विहित चलनाने शासनास परत करावी लागेल
19. अर्जदाराने केंद्रीकृत ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेव्दारा (सीईटी) माध्यमातून प्रवेश घेतला असेल तरच फ्रीशिप साठी पात्र असेल . (**Against Cap/Institute Level साठी योजना लागू राहणार नाही** )
20. आरक्षणाचा लाभ न घेता गुणवत्तेनुसार खुल्या गटातील जागेवर प्रवेश घेतलेल्या अनुसूवित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यासाठी सुध्दा सदर योजना लागू राहील.
21. अर्जदारास अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधीत दोन (दोन वर्ष) किंवा त्यापेक्षा अधिक वेळा नापास झाल्यास तो शिष्यवृत्ती लाभास अपात्र ठरेल
22. अर्जदाराने शिष्यवृत्ती लाभासाठी चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती सादर केली असेल तर त्यास शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही.
23. डुप्लिकेट शाळा सोडल्याचा दाखला असेल तर त्याबाबत पोलीस स्टेशनला दिलेला FIR ची प्रत व १०० रुपयाच्या stamp पेपरवर हमी पत्र द्यावे.
24. ज्या विद्यार्थ्यास शिक्षणात खंड (Gap)असेल त्यांनी Gap प्रमाणपत्र दरवर्षी अर्ज भरतेवेळी शाळा सोडल्याच्या मूळ दाखल्यासोबत जोडणे आवश्यक आहे.